शैक्षणिक वर्षामधील **कामाचे किमान दिवस, शिक्षणाचे तास व शिक्षकांसाठीप्रत्येक आठवड्याला किमान तास निश्चित करणे,**

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र.पीआरइ २०१०/प्रक्र.११४/प्राशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक १ मार्च २०११

**वाचा** -१) बालका- मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, - २००९
२) मुंबइ प्राथमिक शिक्षा नियम, १९४९ नियम क्र. १२५

**प्रस्तावना** - केंद्र सरकारने सन २००२ च्या ८६ व्या संविधान -विशोधन अधिनियमान्वये अनुच्छेद २१ (अे) मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे. त्यानुसार सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम, Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 (No.35, 2009), केंद्र शासनाने पारित करुन तो भारत सरकारच्या २७.८.२००९ च्या राजपत्रात प्रसिध्द केला आहे. तसेच, भारत सरकारच्या दिनांक १६.२.२०१० च्या राजपत्रात सदर अधिनियम दिनांक १.४.२०१० पासून संपूर्ण भारतात (जम्मू व काश्मिर वगळता) लागू केला असल्याचे नमुद केले आहे.

२. समता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची प्रस्थापना ही मूल्ये, सर्व मुलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून साधली जावू शकतात, यादृष्टीने हा अधिनियम अंमलात आणला आहे. त्यामुळे सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविण्याची, त्यांना शाळांमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासने स्विकारली आहे.

३. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील प्रकरण ४ कलम १९ व २५ अन्वये प्राथमिक शाळेसाठी असलेली मानके व निकष यांची पूर्तता करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील प्रकरण ४ कलम १९ (ए) अन्वये अधिनियमातील अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली मानके व निकष यानुसार प्रत्येक शिक्षकांसाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षामधील शिक्षकांच्या कामाचे किमान दिवस व शिक्षणाचे तास तसेच शिक्षकांसाठी प्रत्येक आठवड्याला शाळेतील कामाचे तास व शाळेबाहेरील चिंतन व अभ्यासाचे तास खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

**अ**) इयत्ता पहिली ते पाचवीच्या वर्गासाठी शैक्षणिक वर्षातील शाळेतील शिक्षकांचे कामाचे दिवस किमान २०० इतके राहतील.

**ब**) इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गासाठी शैक्षणिक वर्षात शिक्षकांचे कामाचे दिवस किमान २२० इतके राहतील.

**क)** इयत्ता पहिली ते पाचवी वर्गासाठी शैक्षणिक वर्षातील अध्यपनाचे किमान घड्याळी तास ८०० इतके राहतील.

**ड** ) इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गासाठी शैक्षणिक वर्षातील अध्यपनाचे किमान घड्याळी तास १००० इतके राहतील.

**इ**) प्रत्येक शिक्षकांसाठी प्रत्येक आठवड्याला पाठाची तयारी करण्यासह अध्यापनाचे किमान ४५ तास इतकें राहतील.

**पाठाची तयारी यासाठी स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे** :- अध्ययन अध्यापन विषयक साहित्य तयार करणे, पाठाचे टाचण तयार करणे, सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन विषयक नोंदी, तंत्र विकसित करणे व प्रत्यक्ष मूल्यांकन करणे. मुलांना शिकविण्यासाठी चांगले ज्ञानयुक्त पुस्तके वाचणे. अभ्यासात मागे राहणा-या मुलांना चांगली प्रगती करण्यासाठी चिंतन करणे. क्रमिक पुस्तकांच्या जोंडीने संदर्भ पुस्तके वाचने.

**अध्यापनाचे तास यासाठी स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे** :- प्रत्यक्ष वर्गात अध्यापन करणे, मार्गदर्शनपर सराव घेणे, प्रात्यक्षिकांसाह विद्यार्थाकडून कृती करुन घेणे, दूरदर्शन, रेडिओ व शैक्षणिक दृकश्राव्य साधने इत्यादी मामतंत्रंच्या सहाय्याने दिग्दर्शित अध्यापन व स्वयंअध्ययन करुन घेणे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर देण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०११०३०११४४८५५००१ असा आहे.

**( झं.सा.रणदिवे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, (सर्व)
मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
मा. मुख्यसचिव, यांचे स्वीय सहाय्यक,
मा. प्रधान सचिव, (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई

सर्व आयुक्त, महानगरपालिका
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
सर्व विधान सभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ
सर्व विधान परिषद सदस्य महाराष्ट्र विधानमंडळ
ग्रंथपाल महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन मुंबई यांना (१० प्रतिसह)
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे.
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण ),महाराष्ट्र राज्य,पुणे.
शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य,पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद,पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती),पुणे.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य,पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी, (प्राथमिक / माध्यमिक / प्रौढ) जिल्हा परिषद
सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपरिषद / कटकमंडळे
शिक्षण निरिक्षक (दक्षिण /पश्चिम / उत्तर) बृहन्मुंबई
निवड नस्ती (प्राशि-१)

---------